‘हॉलिडे कार्निव्हल’ मध्ये जयकुमार रावल पर्यटन मंत्र्याचे आश्वासन

# रामदास स्वामी मठाचे लवकरच नूतनीकरण

**खास प्रतिनिधी, नाशिक**

**टाकळी येथील** रामदास स्वामी मठाच्या नूतनीकरणाचे काम लवकरच होणार असून इगतपुरी येथे ‘वेलनेस’ सेंटर कार्यान्वित करण्यात येत असल्याची माहिती राज्याचे पर्यटनमंत्री जयकुमार रावल यांनी दिली. काम न केल्यास आरोप आणि काम सुरू केले तरी विरोध होत असल्याचे सांगत त्यांनी गंगापूर बोट क्लबचे भवितव्य अधांतरी असल्याचे संकेत दिले. कृषिमालास अधिक किंमत मिळाल्यास वाईन उद्योगाची वाढ होईल असेही त्यांनी नमूद केले.

ट्रॅव्हल एजंट असोसिएशन ऑफ नाशिक (तान) संस्थेच्या वतीने आयोजित ‘हॉलिडे कार्निव्हल’ या महोत्सवाचे उद्‌घाटन शुक्रवारी रावल यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमास आ. प्रा. देवयानी फरांदे, आ. बाळासाहेब सानप, तानचे अध्यक्ष दत्ता भालेराव आदी उपस्थित होते. पर्यटनात कोकणास जितके महत्त्व आहे, तितकेच नाशिकला आहे. त्यामुळे पर्यटन विकासासाठी नाशिकला सर्वाधिक निधी दिला जात असल्याचे रावल यांनी नमूद केले.मठाच्या नुतनीकरणाला आचारसंहिता संपुष्टात आल्यानंतर सुरुवात होईल. २०१७ हे वर्ष पर्यटन वर्ष म्हणून जाहीर करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने नाशिक विभागात काय काय करता येईल, याचा विचार केला जात आहे, असे रावल म्हणाले.